# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 10.09.2024** **वार – मंगळवार**

---

**चपट्या**

पावसाळ्याच्या दिवसांमध्ये रक्तदान शिबिरांची संख्या कमी झाली असून १५ ऑगस्टनंतर रक्तदान शिबिरंही हव्या त्या प्रमाणात झालेली नाहीत. त्यामुळं प्लेटलेट्सच्या मागणीत ३० ते ३५ टक्क्यांनी वाढ झाल्याचं पुण्यातील रक्तपेढ्यांनी सांगितलं. गेल्या काही दिवसांपासून शहर आणि परिसरात डेंग्यू आणि पावसाळी आजारांच्या रुग्णांचं प्रमाण वाढल्यानं ही मागणी वाढली आहे. त्यामुळं अधिकाधिक रक्तदात्यांनी रक्तदानासाठी पुढे येण्याचं आवाहन रक्तपेढ्यांनी केलं आहे.

**एसटी**

राज्य परिवहन महामंडळाच्या इलेक्ट्रीक बसची संख्या वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर एसटी महामंडळाकडून ठिकठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारले जाणार आहेत. यापैकी स्वारगेट आगारात नव्यानं ५० चार्जिंग पॉइंट बसविण्यात येणार असून, येत्या सहा महिन्यांत हे काम पूर्ण होईल. यामध्ये शिवाजीनगर आणि स्वारगेट आगार, बाहेरील तसंच विभागीय कार्यालयातील एकंदर ५०० इलेक्ट्रिक बसेसचं एका दिवसात चार्जिंग होणार आहे अशी माहिती पुणे विभाग नियंत्रक प्रमोद नेहूल यांनी दिली.

**पिंचिअर्थसंकल्प**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'अंदाजपत्रकात नागरिकांचा सहभाग' जनजागृती मोहिमेला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद लाभत आहे. या मोहिमेत १८ ते ७० वयोगटातील नागरिकांच्या सुमारे २ हजारपर्यंत सूचना महापालिकेस प्राप्त झाल्या असून नागरिकांना आपल्या परिसरातील विकासकामं सुचवण्यासाठी ही संधी महापालिकेनं उपलब्ध करून दिली आहे. पीसीएमसी स्मार्ट सारथी ॲप डाऊनलोड करून ऑनलाईन पद्धतीनं 15 सप्टेंबरपर्यंत सूचना करण्याचं आवाहन महापालिकेनं केलं आहे.

**पिंचिखड्डे**

पिंपरी चिंचवड शहरातील रस्त्यांवरील खड्ड्यांबाबतचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि देखभाल दुरूस्तीकरिता महानगरपालिका लवकरच रस्ते सर्वेक्षण आणि देखभाल उपक्रम सुरू करणार आहे. याअंतर्गत स्वयंचलित पद्धतीनं महापालिकेच्या भौगोलिक माहिती प्रणालीत माहिती संकलित केली जाईल. पिंपरी चिंचवड शहरात साधारण १ हजार ७०० किलोमीटर लांबीचे क्रॉक्रीट आणि डांबरी रस्ते आहेत. तीन वर्षांसाठी हे सर्वेक्षण केले जाणार आहे अशी माहिती पालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

**मोबदला**

संपादित हंगामी बागायती जमिनीसाठी दीडपट परतावा मिळवून दिल्याबद्दल मावळ तालुक्यातील इंदोरी गावातल्या रिंगरोड-बाधित शेतकऱ्यांनी आज खासदार श्रीरंग बारणे यांची भेट घेऊन त्यांना धन्यवाद दिले. खासदार बारणे यांनी गेल्या महिन्यात शेतकऱ्यांसमवेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन रिंग रोडबाधित सर्व शेतकऱ्यांना दीड पट परतावा मिळावा अशी मागणी करणारं निवेदन दिलं होतं. मुख्यमंत्री शिंदे यांनी ताबडतोब ती मागणी मान्य करून त्यानुसार आदेश काढण्याच्या सूचना महसूल विभागाला दिल्या होत्या.

**गुतामं**
समाजातील वंचित आणि तळागाळातल्या घटकांसाठी काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा गौरव करण्यासाठी श्री गुरुजी तालिम मंडळाद्वारे यंदाचे सन्मान जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये दिव्यांग कल्याण संस्था, क्वीन मेरी टेक्निकल संस्था, गुरुमा डॉक्टर मंजुश्री गोशाळा, समाधान पोलिस मित्र परिवार, पुण्यजागर प्रकल्प यांचा समावेश आहे. 21 हजार रुपये आणि मानपत्र असं या पुरस्कारांचं स्वरुप असल्याचं मंडळाचे अध्यक्ष प्रवीण सिंह परदेशी यांनी एका प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

**बस**
पुण्यातून सांगलीकडं प्रवासी घेऊन निघालेल्या शिवशाही बसला आज दुपारी साताऱ्याजवळ आग लागली. धूर येत असल्याचं पाहून चालकानं प्रवासी खाली उतरवल्यानं दुर्घटना टळली. आगीत प्रवाशांचं साहित्य जळून खाक झालं. आगीमुळं महामार्गावरील वाहतूक काही काळ थांबली होती.

**गुंड**
पुण्यात, गणेशोत्सवादरम्यान भाविकांकडील मोबाइल संच, दागिने, रोकड चोरणारे, तसंच गैरप्रकार करणाऱ्यांना पकडून लष्कर पोलीस ठाण्यातील स्थानबद्धता केंद्रामध्ये ठेवण्याची व्यवस्था प्रथमच सुरू करण्यात आली आहे असं पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितलं. महिलांची छेड काढणाऱ्यांना पकडून त्यांच छायाचित्र भर चौकात लावलं जाईल तसंच त्यांची पोलिसांकडून धिंडही काढण्यात येईल, असा इशारा आयुक्तांनी दिला आहे.

**निधन**
एकपात्री, नाट्य, चित्रपट, मालिका अशा विविध माध्यमातून गेली पन्नासहून अधिक वर्षे रसिकांचं मनोरंजन करणारे जेष्ठ रंगकर्मी, हास्य कलाकार दिलीप हल्याळ यांचं हृदयविकारानं पुण्यात निधन झालं. ते ६५ वर्षांचे होते. 'बंपर लाफ्टर, नजराणा हास्याचा' या कार्यक्रमातून त्यांनी रसिकांच्या मनात आनंदाची पेरणी केली. एकपात्री कलाकार परिषदेचे ते माजी अध्यक्ष होते.

**हॉकी**
पुण्यात सुरु असलेल्या चौथ्या हॉकी इंडिया वरिष्ठ पुरुष आंतरविभागीय राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत आज सकाळच्या सत्रात झालेल्या सामन्यात पेट्रोलियम क्रिडा प्रोत्साहन मंडळ संघानं आय टी वी पी केंद्रीय हॉकी संघाला 5-1 अशा फरकानं नमवलं. तर अन्य सामन्यात भारतीय क्रीडा प्राधिकरण संघानं केंद्रीय प्रत्यक्ष कर विभागावर 5-1 अशी मात करत आगेकूच कायम राखली.

पुण्यात आज दुपारनंतर पावसाच्या सरी पडल्या. उद्याही हलक्या सरी अपेक्षित आहेत. कमाल तापमान 30 अंश सेल्सियस राहील.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**